**आकाशवाणी मुंबई**

सध्या हाती आलेल्या कलांनुसार राज्य विधानसभा निवडणुकीत महायुती आघाडीवर असल्याचं दिसतंय. महायुतीतले प्रमुख घटक पक्ष आतापर्यंत २२१ जागांवर आघाडीवर आहेत. त्यात भाजपा १२७, शिवसेना ५६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस ३८ जागांवर पुढे आहे. तर महाविकास आघाडीतले प्रमुख घटक ५० जागांवर आघाडीवर आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १८, काँग्रेस १७ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १५ जागांवर पुढे आहे.

**<><><><><>**

वडाळा मतदारसंघात भाजपाचे कालिदास कोळंबकर सलग सहाव्यांदा विजेते झाले आहेत.सोळा फेऱ्यांच्या मतमोजणीनंतर त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार आणि माजी महापौर श्रद्धा जाधव यांचा २४ हजार ९७३ मतांनी पराभव केला आहे. अधिकृत घोषणा थोड्याच वेळात होईल.

**<><><><><>**

**कोपरी पाचपाखाडी** मतदार संघात मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर शिवसेनेचे उमेदवार एकनाथ शिंदे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे केदार दिघे यांच्यापेक्षा २७ हजार ४७९ मतांनी आघाडीवर आहेत.

**नागपूर दक्षिण पश्चिम** मतदार संघात मतमोजणीच्या आठव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांच्या पेक्षा १२ हजार ३२९ मतांनी आघाडीवर आहेत.

**नागपूर उत्तर** मतदार संघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीअखेर काँग्रेसचे उमेदवार नितिन राऊत त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे उमेदवार मिलिंद माने यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**अक्कलकुव्यात** काँग्रेसचे उमेदवार के सी पाडवी त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार माजी खासदार डॉ हीना गावित यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**नंदुरबारमधून भाजपाच्या** विजयकुमार गावित यांनी काँग्रेसच्या किरण तडवी यांना मागे टाकलं आहे.

**सिंदखेडा** मतदार संघात भाजपाचे जयकुमार रावल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार संदीप बेडसे यांच्या पुढे आहेत.

**जळगाव ग्रामीणमध्ये पाणीपुरवठा मंत्री** गुलाबराव पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार गुलाबराव देवकर यांना मागे टाकलंय.

**जामनेर** मतदार संघात भाजपाचे उमेदवार गिरीश महाजन आघाडीवर आहेत.

**मुक्ताईनगर** मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार रोहिणी खडसे, **तिवसामधून** काँग्रेसच्या उमेदवार यशोमती ठाकूर, **काटोलमधून** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार सलील देशमुख, **कामठी** मतदार संघातून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सिल्लोडमधून अब्दुल सत्तार पिछाडीवर आहेत. **साकोलीतून** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, **पालघर** मतदार संघातून शिवसेनेचे उमेदवार राजेंद्र गावित, **कल्याण** पूर्वमधून भाजपच्या सुलभा गायकवाड आघाडीवर आहेत. **डोंबिवलीतून** भाजपचे रविंद्र चव्हाण, **मीरा-भाईंदरमधून** भाजपचे उमेदवार नरेंद्र मेहता, **ओवळा माजिवडा** प्रताप सरनाईक, **औरंगाबाद पूर्व** मतदार संघात मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील **औरंगाबाद पश्चिममधून** संजय शिरसाट आघाडीवर आहेत. **ठाणे शहर** मतदार संघात मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर भाजपचे उमेदवार संजय केळकर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन विचारे यांच्या पेक्षा १४ हजार ६३१ मतांनी आघाडीवर आहेत.

**नांदगावमधून** सुहास कांदे, **मालेगाव** बाह्यमधून दादाजी भुसे आणि येवल्यातून छगन भुजबळ आघाडीवर आहेत.

<><><><><>

सध्या हातकणंगलेतून अशोक माने हे जनसुराज्य पक्षाचे, भिवंडी पूर्वमधून रईस शेख आणि मानखुर्द शिवाजी नगरमधून अबु आझमी हे समाजवादी पार्टीचे उमेदवार सध्या आघाडीवर आहेत. राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा बडनेरामधून, MIM २, आझाद समाज पार्टी - कांशीराम १, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप राजुरामधून, मालेगाव मध्य मतदारसंघातून Indian Secular Largest Assembly of Maharashtra चे असिफ शेख रशीद, कळवणमधून माकपाचे जीवा पांडू गावित, सांगोल्यातून शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख, शिरोळमधून राजर्षी शाहू विकास आघाडीचे राजेंद्र पाटील यड्रावकर आघाडीवर आहे.

<><><><><>

राज्यात आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार ५ जागांवर अपक्ष आघाडीवर आहेत. नवापुरातून शरद गावित, जुन्नरमधून शरद सोनवणे, शेवगावमधून चंद्रशेखर घुले पाटील, चंदगडमधून शिवाजी पाटील आणि उत्तर कोल्हापुर उत्तरमधून राजेश लाटकर सध्या आघाडीवर आहेत.

<><><><><>

प्रमुख राजकीय पक्ष वगळता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं १२५, तर वंचित बहुजन आघाडीनं २०० उमेदवार रिंगणात उतरवले होते. मात्र मतपेटीत याचा फारसा परिणाम जाणवत नसल्याचं दिसून येत आहे. आत्तापर्यंतच्या कलांनुसार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला फक्त १ पूर्णांक ५८ शतांश टक्के मतं मिळाली आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे वरळीमधून, तर शिवडीमधून मनसेचे विद्यमान आमदार बाळा नांदगावकर हे दोघेही पिछाडीवर आहेत. दुसरीकडे वंचित

बहुजन आघाडीला मिळालेल्या मतांचं प्रमाण नगण्य असून त्यांचे उमेदवार मुख्य शर्यतीच्याही बाहेर पडल्याचं चित्र आहे.

<><><><><>

महाराष्ट्राच्या जनतेनं महायुतीला भरघोस मतं दिल्याबद्दल भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी जनतेचे आभार मानले आहेत. या विजयात राज्यातल्या महिलांचा मोठा वाटा असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्या पक्षाला बहुमत मिळतं त्या पक्षाचा नेता सर्वसाधारणपणे मुख्यमंत्री होतो, सर्वाधिक जागा भाजपाला मिळाल्या आहेत, त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असं वाटत आहे, मात्र महायुतीच्या पक्षांमध्ये विचारविनिमय करून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीची मतमोजणी पण आज होते आहे. आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार झारखंड मुक्ती मोर्चा आणि भाजपा २८, काँग्रेस १४, राष्ट्रीय जनता दल ५, AJSUP १, लोकजनशक्ती रामविलास पक्ष, झारखंड लोकतांत्रिक मोर्चा, माकपा मार्क्सिस्ट लेनिनिस्ट, संयुक्त जनता दल आणि अपक्ष प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे.

<><><><><>

देशात आज लोकसभेसाठी २ जागांवरही मतमोजणी होते आहे. केरळमधल्या वायनाडमध्ये काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी आणि नांदेडमध्ये भाजपाचे संतुकराव हंबर्डे आघाडीवर आहेत. याशिवाय विविध राज्यातल्या एकूण ४८ मतदारसंघातही विधानसभेची मतमोजणी होते आहेत.

//<><><><><>//